# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

--ईमेल व्दारे

क्रमांक : १६/आस्था/अग्रिम वाटप/२०१९/९९३

दिनांक : ५/७२/२०१९

प्रति,

१) सहसंचालक, सर्व विभागीय कार्यालये,

२) प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी, महाविद्यालये व तंत्रनिकेतने,
व तत्सम संस्था.

विषय :शासकीय कर्मचाऱ्यांना अग्रिमांबाबतची कार्यवाही करणेबाबत...

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखाली कार्यालये / संस्थांमधील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे घरबांधणी / मोटार कार / मोटार सायकल / संगणक अग्रिमाबाबतचे अर्ज या संचालनालयास नियमितपणे प्राप्त होत असतात. सदर प्रकरणी प्राप्त अर्जानुसार अग्रक्रमाने शासन निर्णयातील तरतूदीनुसार परीगणना करुन त्यानुसार अग्रिमाचे वाटप संबंधितांना केले जाते. तथापि, खाली नमूद बाबींबाबतची कार्यवाही संबंधित संस्था प्रमुखांकडून होणे आवश्यक आहे.

१) अग्रिम साठी अर्ज केलेल्या अर्जदारांना अग्रिम मंजूरी साठी आवश्यक सेवेचा **विहित कालावधी** तपासून पाहणे.

२) संबंधिताचे अर्जासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे योग्य असल्याबाबतची खात्री करणे. तद्नंतरच प्रस्ताव सादर करण्यात यावा.

३) काही अधिकारी / कर्मचारी हे अग्रिम मंजूरीनंतर दुस-या संस्थेमध्ये बदलीने रुजू होतात. तथापि संबंधितांनी अग्रिम मंजूर झालेल्या संस्थेमध्ये कागदपत्रे **गहाणखतासहीत** सादर केलेली असल्याबाबतची खात्री करणे. तसे नसल्यास तात्काळ संबंधितांकडून पूर्ण अग्रिम रक्कम शासन निर्णयात नमूद दंडनीय व्याजासह वसूल करण्यात यावी.

४) आपल्या संस्थेतील कर्मचा-यास अग्रिम मंजूर झाल्यानंतर संबंधिताकडून अग्रिमासंबंधीची कागदपत्रे आणि **गहाणखत** सादर केल्याबाबतची खात्री करणे. तसे नसल्यास संबंधितांकडून पूर्ण अग्रिम रक्कम शासन निर्णयात नमूद दंडनीय व्याजासह वसूल करण्यात यावी.

५) अग्रिम मंजूर करण्यात आलेल्या कर्मचा-याने विमा संचालनालयाकडून घरबांधणी अग्रिमासाठी आवश्यक असणारा **विमा** उतरवल्याची खात्री करुन घेणे.

सदर प्रकरणी आपल्या संस्थेतील अग्रिम प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसे न झाल्यास लेखा परीक्षणात आक्षेप आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक, तंत्रशिक्षण,म.रा., मुंबई.

प्रत : कार्यासन क्रमांक १२, मुख्य कार्यालय, मुंबई.